# संक्षिप्त संपरिक्षा

१. खटल्याचा क्रमांक : १६०३ /२०१७    २. गुन्हयाचा दिनांक : २०/०४/२०१७

३. दाखल दिनांक : २०/०४/२०१७    ४. तक्रारदाराचे नाव : आर आर शिंदे

५. आरोपीचे नाव : **भारत श्रीराम जैस्वाल. राह. डिफेन्स कॉलनी, दौंड जि पुणे.**

६. गुन्हयाचा तपशिल : तुम्ही दिनांक **२०/०४/२०१७** रोजी २२.३० वाजता गाडी क्रं. ११०२८ मध्ये प्लॅटफॉर्म नं. ६ वर विना परवाना, विनातिकीट पुडी विकत होते, आणि तुम्ही भारतीय रेल्वे कायदा कलम १४४, १३७, १३८ चा अपराध केलेला आहे.

**आरोपीचे निवेदन** :—

| | | |
|---|---|---|
| प्र. १. | : | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्र. २. | : | तुम्हाला आता गुन्हा समजवून व वाचून दाखविला तो समजला काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्र. ३. | : | तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्र. ४. | : | तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय? |
| उत्तर | : | नाही. |

भारत

**आरोपीची सही**
**दिनांक : २०/०४/२०१७.**

२०/४/१७

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौण्ड.**

## आदेश

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केलेला आहे. त्यांनी प्रार्थना केली आहे की, ते गरीब असलेमुळे कमीतकमी शिक्षा करणेत यावी. परंतु आरोपींच्या वर्तवणुकीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. अशा प्रकारच्या आरोपींबद्दल प्रवासी तोंडी तक्रारी करीत आहेत. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपींला भारतीय रेल्वे कायदा कलम १४४ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ अन्वये दोषी ठरवून २०००/— दंड व **दोन** दिवस साध्या कैदेची शिक्षा करणेत येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीनें आणखी **दोन** दिवस साधा कारावास सोसावा.

२. आरोपींला भारतीय रेल्वे कायदा कलम १३७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ अन्वये दोषी ठरवून १०००/— दंड करणेत येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीनें आणखी **दोन** दिवस साधा कारावास सोसावा.

३. आरोपींना भारतीय रेल्वे कायदा कलम १३८ अन्वये ३२०/— दंड करणेत येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीनें आणखी **दोन** दिवस साधा कारावास सोसावा. पैकी रक्कम रूपये ३२०/— रेल्वेस जमा करावेत.

२०/४/१७

दिनांक : २०/०४/२०१७.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौण्ड.**